**जबाब** दिनांक :– १५/१२/२०१०.

श्री.शेवंतीलाल शांतीलाल कापशी, वय/७५ वर्षे, व्यवसाय–व्यापार, रा.डी.७०३, प्लेझेंट पॅलेस, १६ नारायण दाभोळकर रोड, मुंबई ०६, मो.क्र.९८२१०३६७११.

——००——

मी वरील प्रमाणे असुन सदर ठिकाणी माझ्या कुटुंबियासह ३६ वर्षापासुन राहावयास आहे. सध्या स्टील ट्रेडींग व बांधकाम करून मिळणाऱ्या उत्पनावर कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालवितो. आज रोजी आझाद मैदान पोलीस ठाणे येथे येवुन आम्ही दि.०१/११/२०१० रोजी दिलेल्या तक्रारअर्जाच्या संदर्भात माहिती देत आहे ती पुढीलप्रमाणे–

फटाकडा चाळ, ७५, ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई १८ ही जागा सिएस क्र.१/४७, २/४७ व ११७ ते १२१ पर्यंत लोअर परेल डिव्हीजन मध्ये आहेत. या ठिकाणी ८ चाळी व ३ बिल्डींग होत्या. त्या सदर परीसरामध्येच आमची मे.रूबी कोच बिल्डर्स प्रा.लि. ही कंपनी होती. सदर कंपनीकरीता २ शेड होत्या. सदरच्या शेडमध्ये बस बॉडी बनविण्याचे काम चालत होते. सदर जागेचे मालक श्री.रमजान अली शरीफ लखानी हे होते. तसेच त्यांच्या जागेमध्ये आम्ही भाडेकरू होतो. श्री.रमजान अली शरीफ लखानी यांनी सदरच्या भाडेकरूसह सदरची जागा मे.फाजलभाई इब्राहीम ॲन्ड कं.लि. यांना सन १९४६ मध्ये तारण म्हणुन ठेवली होती व त्यांच्याकडुन काही प्रमाणात कर्ज घेतले होते. त्याबाबत त्यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे दावे दाखल केलेले होते. दरम्यानच्या काळात रमजान अली शरीफ लखानी यांचे दि.२९/०८/१९७८ रोजी निधन झाले. निधनापुर्वी रमजान अली शरीफ लखानी यांनी मृत्युपत्र बनविले होते व त्या मृत्युपत्राच्या आधारे श्री.हुसेन शरीफ लखानी व श्री.मोहम्मद शरीफ लखानी यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथील दाव्यामध्ये वादी म्हणुन हक्क सांगितले. ते मा.उच्च न्यायालयाने स्विकारले आहे.

तसेच श्री.हुसेन शरीफ लखानी व श्री.मोहम्मद शरीफ लखानी यांनी माझे बंधु चिरंजलाल यांच्यासोबत बोलणी करून फटाकडा चाळ ही जागा भाडेकरू सह विकत घेण्याबाबत आग्रह केला. त्यावेळी आम्हाला सुध्दा जागेची गरज असल्याने आम्ही सदरच्या व्यवहारात संमती दर्शवुन उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित असलेल्या दाव्यामध्ये आम्ही पार्टी बनुन उच्च न्यायालयाच्या संमतीने कंसेन्ट दाखल करून मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जागा मालक व त्यांच्यावर कर्ज देणारा यांना कोर्ट रिसिव्हर मार्फत पैसे देवुन सदरच्या जागेचा ताबा आम्ही कायदेशीर मार्गाने मिळविला. सदरचा सुट क्र.३६०/१९७९ असा असुन न्यायमुर्ती शरद मनोहर यांनी दि.१६/०१/१९८५ रोजी आदेश दिल्याने सदरच्या जागेचा ताबा कायदेशीर मार्गाने घेतलेला आहे.

त्यानंतर आमच्या रूबी कंपनीचे काम तेथे करणे बंद करून सदरचे कामकाज आमच्या अंधेरी येथील कारखान्यामध्ये काम चालु केले. तसेच सदरच्या ठिकाणी आम्ही नवीन इमारत बांधण्याकरीता मुंबई महानगर पालिकेकडुन रितसर परवानगी सन १९९४ मध्ये मिळवुन सदर ठिकाणी ४ माळ्याची इमारत बांधली. तसेच सदर ठिकाणी ८ चाळीमध्ये असलेले भाडेकरू यांच्याशी बोलणी केली. त्यांनी त्यांचे जागा पुर्नविकास करण्यास संमती दर्शविल्याने त्यांच्याकडुन रितसर संमतीपत्रके घेतली. तसेच सदरच्या चाळी पुर्नविकास करण्याबाबत मुंबई महानगर पालिकेकडे तसेच म्हाडाकडे प्रस्ताव सादर केला. व त्याप्रमाणे संबधिताकडुन बांधकामास सन २००७ मध्ये परवानगी मिळवुन सध्या त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्याचे काम चालु आहे. तसेच तेथील भाडेकरूना मोकळ्या जागेवर तात्पुरते निवासस्थाने दिले आहेत.

रमजानअली शरीफ लखानी यांना १ मुलगी नामे खैरूनिसा होती. तिने कमलउद्दीन प्रधान यांच्यासोबत लग्न केलेले होते. त्यांना रजिया, मुमताज अशा २ मुली व सिराज हा १ मुलगा होता. श्रीमती रजिया यांनी अमिरअली इब्राहीम श्रॉफ यांच्यासोबत लग्न केलेले होते व त्यांना फयाज व आसिफ अशी २ मुले आहेत. खैरूनिसा कमलउद्दीन प्रधान यांचा मृत्यु दि.०५/०२/१९९९ रोजी झाला. त्यानंतर त्यांचे पती कमलउद्दीन प्रधान यांचा मृत्यु दि.०१/०९/२००० रोजी झाला. मृत्यु पर्यंत खैरूनिसा ही व तिचे नातेवाईक हुसेनअली, मोहम्मदअली तसेच वडील रमजानअली हे सर्व ईस्टन बिल्डींग, ३८, स्टेशन रोड सांताकुझ(प.), मुंबई. येथे राहत होते.

अमीरअली इब्राहीम श्रॉफ याने त्याची सासु सासरे खैरुनिसा व कमलउद्दीन यांच्या मृत्यु दि. ०१/०९/२००० नंतर त्याने आमच्या वरळी येथील मालमत्तेबाबत आम्हाला पत्रे पाठवुन सदरची जागा ही त्याच्या मालकीची असुन त्या जागेबाबत त्यांच्यासोबत तडजोड करण्याबाबत पत्राद्वारे धमकावीत होता. तसेच आम्ही त्याच्या प्रयत्नास प्रतिसाद देत नसल्याचे पाहुन त्याने मा.जिल्हा अधिकारी तसेच मा.मुख्यमंत्री, मा.महसुल मंत्री, तसेच म्हाडाच्या संबधित विभागाकडे तसेच मुंबई महापालिकेमधील विविध विभागामध्ये खोडसाळपणे तक्रारअर्ज करुन सदरची जागा त्याच्या सासुच्या मालकची असल्याचे भासवित होता. तसेच फटाकडा चाळ येथील काही रहीवाशांना हाताशी धरुन आमच्या जागेमध्ये बेकायदेशीर घुसुन सदर ठिकाणी फोटो वगैरे काढुन घेतलेले आहेत. तसेच तेथील रहीवाशांना तोच मालक असल्याचे सांगुन सदर जागेबाबत त्यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला असुन सदरची जागा लवकरच त्याच्या ताब्यात मिळणार आहे असे सांगत होता. आमच्या  पुर्नविकास मध्ये अडचण आणुन आम्हाला तो त्यामध्ये दबाव आणत होता.

अमीरअली इब्राहीम श्रॉफ यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क.२६७७/२००७ अन्वये दावा दाखल केला असुन त्यामध्ये आमच्या मे.निशुनी कार्पोरेशन या कंपनीस प्रतिवादी केलेले आहे. तसेच सदरचा दावा दाखल केल्यानंतर तो अधुनमधुन वेगवेगळया व्यक्तीकडुन आणि राजुला इंटरप्रायजेसच्या लेटर हेडवर पत्रे लिहुन सदरच्या जागेपैकी ३५,००० स्वेअर फुट एवढी जागा आम्हाला देण्यात येईल असे कळविले आहे. तसेच त्याने वेगवेगळया इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये वरळी येथील जागेबाबत जाहीरात दिल्याचे कात्रण त्याच्या लेटरहेडवर झेरॉक्स करुन पाठविले आहे. अशाप्रकारे अमीरअली इब्राहीम श्रॉफ यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा दाखल केला असताना सुध्दा सन २००९ पर्यंत आमच्यावर अनेक व्यक्तीकडुन दबाव आणुन सदरच्या मालमत्तेबाबत तडजोड करण्याबाबत धमकावत होता.

अमीरअली इब्राहीम श्रॉफ याने उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेला दावा क.२६७७/०७ बाबत सन २००९ मध्ये चेंबर समन्स क.१३५२/२००९ अन्वये नोटीस काढुन आम्हाला अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याबाबत आम्ही आमचे वकील नामे श्री.मधुसुदन गावडे आणि इतरांमार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये प्रतिज्ञा पत्र सादर करुन संपुर्ण माहिती दिली होती. त्यानंतर सदर चेंबर समन्स बाबत आम्ही हरकत घेतली. त्यांनी सादर केलेल्या कागदपत्राचे तपासणी करुन घेतले. त्यानंतर आम्ही फयाज अमीरअली श्रॉफ व आसिफ अमीरअली श्रॉफ याने सांताक्रुझ येथील लॅन्ड सर्व्हे ऑफिस येथे दाखल केलेल्या कागदपत्राची प्रमाणित नक्कल मिळण्याबाबत माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये अर्ज दाखल केला होता. त्या अर्जाच्या आधारे आम्हाला नगर भुमापन अधिकारी, बांद्रा यांच्याकडुन प्रमाणित कागदपत्र मिळाले.

अमीरअली इब्राहीम श्रॉफ याने मुंबई उच्च न्यायालय येथे दावा दाखल करताना सादर केलेले मुळ कागदपत्र (पॉवर ऑफ ऍटर्नी) आम्ही मा.न्यायालयास विनंती करुन ताब्यात घेण्याबाबत सांगितले. त्यामुळे उच्च न्यायालयाचे मा.न्यायमुर्ती कानडे यांनी आदेश दिल्याने रजिस्ट्रार/प्रोथोनोटरी यांनी सदरच्या पॉवर ऑफ ऍटर्नी(१९९९) ताब्यात घेवुन त्या सिल करुन कस्टडी मध्ये ठेवल्या. सदरच्या पॉवर ऑफ ऍटर्नी व आम्ही नगर भुमापन अधिकारी, बांद्रा, मुंबई (१९९९) यांच्याकडुन मिळविलेल्या प्रमाणित पॉवर ऑफ ऍटर्नी यांच्या पैकी न्यायालयामध्ये जमा केलेल्या सर्व ३ पॉवर ऑफ ऍटर्नी मधील पान क.२ काढुन त्याचे ऐवजी पान क.१ (स्टॅम्प पेपर) च्या पाठीमागे पान क.२ आमच्या वरळी येथील जागेचा तपशिल जाणुनबुजुन टंकलिखित करुन सदरची पॉवर ऑफ ऍटर्नी धारक म्हणुन अमीरअली इब्राहीम श्रॉफ नावे करीत असल्याचा मजकुर टंकलिखित केला. तसेच अमीरअली इब्राहीम श्रॉफ याची पत्नी रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी बांद्रा येथील सिटी सर्व्हे क.एच/३४६, एच/३४७, एच/३४८, एच/३४९ येथील ११३८.१ चौ.मी. हया जागेबाबत नामे फयाज अमीरअली श्रॉफ व आसिफ अमीरअली श्रॉफ यांच्या नावे अधिकार पत्र (पॉवर ऑफ ऍटर्नी) १९९९ मध्ये दिली असल्याचे मुळ कागदपत्रामध्ये दिसुन येते. तसेच सदरच्या मुळ अधिकारपत्रामध्ये आमच्या वरळी येथील मालमत्तेचा उल्लेख नाही.

रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी "सर–सर रिजॉइंडर" मध्ये दिलेल्या प्रतिज्ञापत्रात रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी मा.न्यायालयात शपथेवर असे कळविले आहे की, ज्या पॉवर ऑफ ॲटर्नीचा आधार घेवुन दावा क्र.२६७७/२००७ दाखल केलेला आहे. त्या पॉवर ऑफ ॲटर्नी खऱ्या असुन आम्हीच अशा प्रकारच्या पॉवर ऑफ ॲटर्नी अमीरअली इब्राहीम श्रॉफ यांना दिलेल्या आहेत. हे तिघांनी मुळ पॉवर ऑफ ॲटर्नी फय्याज श्रॉफ व आसिफ श्रॉफ यांना दिलेली होती. आणि त्याचा वापर सिटी सर्व्हे ऑफिसमध्ये केलेला आहे. त्या अमीरअली इब्राहीम श्रॉफ त्याची पत्नी रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी संगनमताने आमच्या कंपनीचा व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांची दिशाभुल करून कट रचुन फसवणुक करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आम्ही मा.ॲड.जनरल कडुन सर्व कोर्टाचे संबधित कागदपत्र व पॉवर ऑफ ॲटर्नी त्यांना देवुन वरील ४ इसमांविरूध्द क्रिमिनल कंटेम पिटीशन मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यासाठी परवानगी मिळाली आहे.

अशा प्रकारे अमीरअली इब्राहीम श्रॉफ याने त्याची पत्नी रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांनी मुलांच्या नावे दिलेल्या अधिकारपत्रामध्ये अधिक मजकुर टंकलिखित करून त्यामध्ये आमच्या वरळी येथील मालमत्तेचा जाणुनबुजुन हेतुपुर्वक उल्लेख करून मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.२६७७/२००७ त्याबाबत दावे दाखल करून मा.न्यायालयाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला. त्यावरून त्यांच्याविरूध्द आम्ही वरील ४ इसमांविरूध्द "Perjury Motion" मा.न्यायालयात दाखल केला आहे. ही खोटे कागदपत्र तयार करण्याचे काम कोर्टात दावे दाखल करण्याचे अगोदर व कोर्टाचे बाहेर झालेले असुन आणि आम्हाला हे खोटे कागदपत्राची कोर्टात तपासणीच्या आम्हाला समजुन आल्याने आणि मा.उच्च न्यायालय, मुंबई हे आझाद मैदान पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात येत असल्याने आम्ही आझाद मैदान पोलीस ठाणे येथे अमीरअली इब्राहीम श्रॉफ, रजिया अमीरअली श्रॉफ, मुमताज सोमाणी व सिराज प्रधान यांच्याविरूध्द तक्रार अर्ज केलेला असुन त्यांच्याविरूध्द आमची वरळी येथील मालमत्ता हडप करण्याचा आम्हाला वारंवार धमकावण्याचा तसेच आमची मालमत्ता विकण्याबाबत इंटरनेटद्वारे जाहिरात बाजी करून आमची मालमत्ता विकण्याकरीता बनावट कागदपत्र तयार करून ती मा.न्यायालयात सादर करून आमची संगनमताने फसवणुक केलेली आहे. म्हणुन माझी त्यांच्याविरूध्द तक्रार असुन त्यांच्याविरूध्द कारवाई करण्यास विनंती आहे.

माझा जबाब हा मराठीत सांगणव्यापर टंकलिखीत केला असुन तो मला वाचुन समजावुन सांगितला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

सहाय्यक पोलीस निरीक्षक १५/१२/१०
आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई.

15.12.10

(15.12.2010)
(17.01.2011 Monday)

गा.मु. औ.-(क) २८२

FORM - 1A

N.C.R.B.
I.I.F.-I

181

पहिली खबर

**FIRST INFORMATION REPORT**

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे आझाद मैदान पहिली खबर क्र. 242 वर्ष 2010 दिनांक 15/12/2010
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भा.द.वि कलमे Sections 420, 465, 467, 468, 469
(ii) अधिनियम Act ✗ कलमे Sections 471, 474, 120(ब), 506
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections सह 34

3. (a) अपराधाची घटना : वार ......... तारीख पासून 2007 वेळ ........ तारीख पर्यंत आज पर्यंत वेळ ........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion )
3. 1) 00.00 ते 03.00 2) 03.00 ते 06.00 3) 06.00 ते 09.00 4) 09.00 ते 12.00 5) 12.00 ते 15.00
6) 15.00 ते 18.00 7) 18.00 ते 21.00 8) 21.00 ते 24.00 9) 06.00 ते 18.00 10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख नमूद वेळ ........
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ........ तारीख 15/12/2010 वेळ 22.30 वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा दक्षिण चौकी/बीट /दुरक्षेत्र नाव व क्र. 03
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/ Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव ........ मुंबई ........ रस्त्याचे नाव
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
Nearest adentifiable Place Village Post Taluka Dist State
(c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ........ तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant /Informant : Permanent Address
(a) नाव Name श्री शांतीलाल कापडी (b) वडीलांचे / पतीचे नाव ई. तीलाल कपाडी
Father s/Husbands Name
(c) जन्म तारीख व वय 64 (d) राष्ट्रीयत्व भारतीय मो. नं. - 9820036711
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........ दिल्याचा दिनांक ........ दिल्याचे ठिकाण ........ (f) व्यवसाय ........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू जात Caste सब जात Sub-Caste
(h) पत्ता : ........ 703, ........ Ward House/Name No. Phone/M. No. Pan No. Card No.
रस्त्याचे नाव मुंबई ओळख ठिकाण ........ गाव ........ पोस्ट ........ पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........ जिल्हा ........ राज्य ........ सध्याचा पत्ता ........
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टचा फॉर्म I B वर घेतल्या शिवाय केस डायरीत अंगलग्नप्रमाणे द्यावा)
Details Name & Address of Known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form I-B of attach FIR I-B to case dairi)
1) आर्चीटेक्ट ........ ........ 701/702, ........ ........, मुंबई-61 2) ........ ........ 3) ........ ........ 4) ........ ........, ........ - 3347, ........

08

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ तक्रार अर्जाच्या चौकशी करून दाखल.
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.
........................................................................

10. a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........................
Total value of properties stolen/involved
b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........................
Unnatural/Accidental Death. case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required ) : Detail write down back blank page.

नमूद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी नामे आमीर अली इब्राहिम श्रॉफ, मो. युसुफ श्रॉफ, मो. मुमताज सोमानी व हिराज प्रधान यांनी २००७ ते आजपावेतो फिर्यादी यांच्या इस्टेटच्या सी.एस. क्र 1/47, 2/47, 1/7 ते 14 पर्यंत लोहार चेंज बिल्डिंग 75, डॉ ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई या मालमत्तेचे बनावट अधिकार पत्र बनवून ते मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दावा क्र 2677/07 सोबत सादर करून त्या मालमत्तेवर कब्जा करण्याचा व ती मालमत्ता विकण्याचा प्रयत्न करून फिर्यादी यांना धमकावून अंडरवर्ल्ड द्वारे जीविताबाबत धमकी देऊन संगनमताने फसवणूक केली म्हणून गुन्हा कलम 420,465,467,468,471,474,120(ब),506 सह 34 भा.दं.वि अन्वये दाखल.

13. केलेली कार्यवाही : 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमान्वये गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ...सपोनि... अर्जुन रा. कोठार
2. तपास करण्यास आला, त्याचे कारण ........................
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला : पोलीस ठाणे ........ जिल्हा ........ नाव ........
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No ........ to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S. ........
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने/फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद नोंदवलेली असल्याचे वाचून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost
( R.O.A.C. )

S S Kul.

(signature)
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer Incharge, Police Station
संपूर्ण नाव Name ... अर्जुन शंकर कोठारे
हुद्दा Rank ... सहायक पो. निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र.
Posting
Code No. of I.O. ..............

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

15. १. न्यायालयात सादर केल्याची तारीख ..............
1. Date and time of submitted to the Court

प्रत. 2. फिर्यादी 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to. 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

४०८४१ फिर्यादी श्री. शांतीलाल शांतीलाल कपारी, वय-७५ वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा.ठि - ७०३, प्लेझंट पॅलेस, १८ नारायण दाभोळकर रोड, मुंबई - ०६ यांचा सविस्तर जबाब स्वतंत्र कागदावर टंकलिखित करण्यात आला असून नोंद या गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावा.

समक्ष

सहायक पो. निरीक्षक
आझाद मैदान पो. ठाणे मुंबई.

S S KV